MHPU180006612010

## निशाणी क्र. ३०७ वरील आदेश
(दिनांक १२.१०.२०२३)

१. वादींतर्फे प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.३५ संपत नाना कोकणे हे दि. ०१.०२.२०२३ रोजी मयत झाले असल्याने त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. ३५ यांचे खालीलप्रमाणे वारस आहेतः–

**३५अ) श्रीमती आशा संपत कोकणे – पत्नी,**
वय – ४५ वर्षे, धंदा – घरकाम व शेती.

**३५ब) श्री. आशिष संपत कोकणे – मुलगा,**
वय – २३ वर्षे, धंदा – शेती.

**३५क) श्री. यश संपत कोकणे, – मुलगा,**
वय – २१ वर्षे, धंदा – शेती,
सर्व राहणार – नंदादेवी (कोकणे वस्ती),
ता. दौंड, जि. पुणे.

**३५ड) स्वाती महेश येडे, – मुलगी,**
वय – २६ वर्षे, धंदा – शेती/घरकाम,
राहणार – गोकळी, पचबीगा वस्ती,
ता. फलटण, जि. सातारा.

२. अर्ज वाचला. वादींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एच. डी. भोईटे यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

३. नि. ३१४ अन्वये दाखल मृत्युच्या दाखल्यावरुन असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.३५ संपत नाना कोकणे हे दि. ०१.०२.२०२३ रोजी मयत झाले. प्रस्तुत अर्ज दि. २३.०३.२०२३ रोजी म्हणजे ९० दिवसांच्या आत दाखल केलेला आहे. दाव्याचे कामकाज पुढे चालविण्यासाठी तसेच गुणदोषावर दाव्याचा निकाल होणेकामी वादींतर्फे दाखल सदर अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचे कामकाज होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे वादींची विनंती मंजुर करण्यात येते. करिता मी खालील आदेश करीत आहेः–

## आदेश

१. वादीचा नि.३०७ चा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादींनी प्रस्तुत आदेशापासुन १४ दिवसांच्या आत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ३५अ ते ३५ड म्हणुन अर्जात नमुद वारसांना समाविष्ट करावे त्याअनुषंगाने दाव्यात

दुरुस्ती करावी तसेच दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी व त्याच्या प्रती इतर प्रतिवादींना दाव्यात.

३. दाव्याची दुरुस्त प्रती दाखल केल्यानंतर प्रतिवादी क्र.३५अ ते ३५ड यांना समन्स पाठविण्यात येतील.

JYOTI BHARAT GOYAL
Digitally signed by JYOTI BHARAT GOYAL
Date: 2023.10.12 17:17:41 +0530

[ **श्रीमती जे.एस.खेडकर–गोयल** ]

ठिकाण– दौंड
दिनांक– १२.१०.२०२३

दिवाणी न्यायाधीश क. स्तर (न्या.क्र. १),
ता. दौंड, जि. पुणे.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file of Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | :- | P. D. Jagatap. |
| Name of the Court | :- | Smt. J. S. Khedkar-Goyal,<br>C.J.J.D. & J.M.F.C. (Court No. 01),<br>Tal. Daund, Dist. Pune. |
| Order date | :- | 12.10.2023. |
| Order singed by the Presiding Officer on | :- | 12.10.2023. |
| Order uploaded on | :- | 12.10.2023. |